REGISTERED No. B. 3434




# अर्थ

*" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ पुणें. बुधवार तारीख १५ फेब्रुवारी, १९५० अंक ७


दी

## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

*[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली. ]*

**स्थापना: १९१६.**

मुख्य कचेरी :

**सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.**

तार : **BANKOP** फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,१६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.

**—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—**

**मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.**

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

मध्यम वर्गीयांना मासिक उत्पन्नांतून एका रकमेनें मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत नाहीं. दरमहा ५ रु. नियमित शिल्लक टाकल्यास पांच वर्षांत ३०० रुपये स्वतःचे होतात. अशा बचत योजनेच्या रकमेवर ३ टक्क्यापर्यंत व्याज मिळण्याची सोय.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

जास्त माहितीसाठी मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.

मुख्य कचेरी:–४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

स्थानिक शाखा:–( १ ) भवानी पेठ. ( २ ) सदाशिव पेठ.

बाहेरगांवच्या शाखा:– (१) टिळक चौक, सोलापूर, (२) वखार भाग, सांगली.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग**

पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१५,५२५ |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखा:–कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एल्एल्. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर

पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.

## विविध माहिती

**अमेरिकेंतील बेकारी वाढली**—अमेरिकेच्या व्यापारी खात्यानें जाहीर केलेल्या माहितीप्रमाणें, अमेरिकेंतील बेकारांच्या संख्येंत एकदम वाढ झालेली आहे. जानेवारी १९४९ मध्यें बेकारांची संख्या ९,९१,००० होती ती आतां ४४,८०,००० झाली आहे. ही संख्या युद्धोत्तर कालांतील सर्वांत मोठी आहे.

**इटलीच्या प्राणि-संग्रहालयासाठी हत्ती**—मिलनमधील प्राणि-संग्रहालयाचे एक अधिकारी सध्या हिंदुस्थानांत आले आहेत. इटॅलिअन पशु-पक्ष्यांच्या मोबदला हिंदुस्थानांतील पशु-पक्षी नेण्याची खटपट ते करणार आहेत. म्हैसूरला असतांना त्यांनीं दोन वाघ आणि दोन हत्ती मिळविले आहेत. हत्ती अजून शिकवून तयार व्हावयाचे आहेत.

**खास रेल्वेगाड्या**—१९४९ च्या डिसेंबरांत हिंदुस्थानांतील रेल्वेनें ३४४ खास गाड्या सोडल्या. त्यापैकीं १२१ सर्व-सामान्य वहातुकीसाठीं, ४६ अन्नधान्यांसाठीं, ४९ मॅंगेनीजसाठीं, ३२ मिठासाठीं, ११ कोळशासाठीं, १४ तागासाठीं, ८ सिमेंटसाठीं २ कापडासाठीं आणि १ साखरेसाठीं सोडण्यांत आल्या. अरुंद रुळाच्या रेल्वे सोडून इतर रेल्वे-मार्गांवर वहातूक समाधानकारक रीत्या चालू होती.

**मुंबई सरकारचें अंदाजपत्रक**—मुंबई सरकारचें १९५०–५१ सालचें अंदाजपत्रक विधिमंडळाच्या कनिष्ठ सभागृहाला ता. २१ फेब्रुवारी रोजीं सादर करण्यांत येणार आहे विधिमंडळाचें काम एकूण ४१ दिवस चालेल. त्यापैकीं मार्च २७, २९ व ३० आणि एप्रिल ११ हे दिवस बिन-सरकारी कामासाठीं ठेवले आहेत.

**साखरेचें उत्पादन वाढलें**—साखरेच्या कारखान्यांच्या हंगामाच्या पहिल्या दोन महिन्यांत, म्हणजे नोव्हेंबर व डिसेंबर १९४९ ह्या महिन्यांत, साखरेचें उत्पादन वाढलें आहे. गेल्या हंगामांतील ह्या दोन महिन्यांतील उत्पादनापेक्षा चालू हंगामांत ७७,००० टन साखर अधिक पैदा झाली आहे.

**मिठाची आयात**— सेंट्रल सॉल्ट ॲडव्हायजरी कमिटीची बैठक नुकतीच भरली होती. ह्या वर्षापासून हिंदमध्यें मिठाची आयात करण्यांत येऊं नये, अशी शिफारस कमिटीनें केल्याचें समजतें. १९४९ मध्यें हिंदमध्यें ६३·५ लाख मण मिठाचें उत्पादन झालें होतें; १९५० मध्यें तें ७० लाख मण व्हावें अशी कमिटीची अपेक्षा आहे. कमिटीची शिफारस सरकार मान्य करील असें वाटतें. ती मान्य झाल्यास हिंदुस्थानचे मिठाच्या आयातीसाठी दरवर्षी खर्च होणारे ७० लाख रुपये वांचतील.

**अन्नधान्याची आयात कमी केली तर?**—मुंबई प्रांतांतील शिधा-वांटप पद्धतीची व्यवस्था लावून देणारे श्री. गोरवाला ह्यांनीं सिडनॅहम कॉलेजमध्यें बोलतांना असा इषारा दिला कीं अन्नधान्याची आयात कमी करण्याचें धोरण अत्यंत अदूरदर्शी-पणाचें आहे. अन्नधान्याची आयात कमी केल्यास देशांत लवकरच दुष्काळ पडेल. ते पुढें म्हणाले, कीं हिंदची निर्यात कमी झाल्यामुळें परदेशी चलन कमी झालें हें म्हणणें बरोबर नाहीं. परदेशी चलनाचा उपयोग कापूस विकत घेण्याकडे केला जात आहे. परदेशी चलन कमी असतें तर गेलीं कांहीं वर्षे हिंदुस्थानला अन्नधान्य कसें आयात करतां आलें असतें?

**हैद्राबादचे विमानतळ आणि रेल्वे**—ता. १ एप्रिल १९५० पासून हैद्राबाद संस्थानमधील रेल्वे, विमानतळ आणि बिनतारी संदेशवाहकांची व्यवस्था हिंदुस्थान सरकार आपल्या ताब्यांत घेणार आहे. ह्या सर्वांची किंमत सुमारें २० कोटी रुपये आहे. निजाम स्टेट रेल्वे सुमारें १,२०० मैल लांबीची असून त्यांत १८ कोटी रुपये भांडवल गुंतलेलें आहे. हिंदुस्थान सरकार संस्थानला नुकसान-भरपाई देणार नाहीं; परंतु उत्पन्नांतील तूट भरून काढण्यासाठीं आर्थिक मदत मात्र देईल.

**टोकिओ शहराची लोकसंख्या**—लोकसंख्येच्या दृष्टीनें जपान-मधील टोकिओ हें शहर आतां जगांत चौथ्या क्रमांकाचें झालें आहे. शहराची लोकसंख्या डिसेंबर १९४९ मध्यें ६०,१९,१३३ होती. बायकांपेक्षां पुरुषांची संख्या ३० टक्क्यांनीं अधिक होती. जपान शरण गेलें त्यावेळीं टोकिओची लोकसंख्या ३४,८८,००० होती. दर महिन्याला ४०,००० जपानी नागरिक, टोकिओंत रहाण्यासाठीं येत आहेत. टोकिओपेक्षा लंडन, न्यूयॉर्क आणि पॅरिस येथील लोकसंख्याच काय ती अधिक आहे.

**सहकारी तत्त्वावर साखरेचा कारखाना**— हिंदुस्थानांतील सहकारी तत्त्वावर चालविला जाणारा पहिला साखरेचा कारखाना श्रीरामपूर जवळ लोणी येथें लवकरच काढण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें कोपरगांव येथेंही एक कारखाना काढण्यांत येणार आहे. दोन्ही कारखान्यांचें भांडवल शेतकऱ्यांनीं जमा केलेलें आहे.

**पाकिस्तानची कोळशाची आयात**— पोलंड आणि पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान झालेल्या व्यापारी कराराप्रमाणें पोलंडनें पाकिस्तानला २,५०,००० टन कोळसा पुरवावयाचा आहे. कराराप्रमाणें पोलंडमधून १०,००० टन कोळसा घेऊन एक बोट निघाली आहे.

**वार्नर ब्रदर्स कंपनीचा धंदा**—वॉर्नर ब्रदर्स ह्या अमेरिकेच्या सुप्रसिद्ध चित्रपट कंपनीचे अध्यक्ष मि. कोहेन हे नुकतेच मुंबईला आले होते. सध्या कंपनी पूर्वी कधीही नव्हती इतकी मजबूत असल्याचें सांगून ते पुढें म्हणाले कीं, कंपनीनें बरेच नवे नट आणि पटकथा जमविल्या आहेत आणि चित्रपट उत्पादनाचें काम मोठ्या प्रमाणावर आतां लवकरच सुरू होईल.

**पंजाबमधून धान्याची निर्यात**—पतियाळा आणि पूर्व-पंजाब संस्थान-संघानें भारतांत निर्यात करावयाच्या अन्नधान्यांत वाढ करण्याचें ठरविलें आहे. ५०,००० टन अन्नधान्याऐवजीं आता ७०,००० टन अन्नधान्य निर्यात करण्यांत येणार आहे.

**आसाममधील निर्वासितांना मदत**—आसाममधील निर्वासितांना मदत म्हणून आसामच्या सरकारनें १० लाख रुपये मंजूर केले आहेत. ह्या रकमेचा उपयोग गौहत्ती येथें दोन खोल्यांची ५०० घरें बांधण्याकडे करण्यांत येणार आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १५ फेब्रुवारी, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ठेवींत घट, नफा कायम.

१९४९ सालीं हिंदी शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत मोठी घट झाली, त्याचे आकडे खालील तक्त्यांवरून समजून येतील. १९४७ च्या मानानें १९४८ मध्यें एकूण ठेवींत फक्त ११ कोटी, ३४ लक्ष रुपयांची घट झाली होती, आणि ही घट होण्याचें कारण चालू खात्यांतील ठेवी ९ कोटींनीं वाढूनहि २०३ कोटींनीं मुदती ठेवी कमी झाल्या हें होय. व्यापारी व कारखानदार ह्यांना रोजच्या व्यवहारासाठी बाजूस काढून ठेवलेले पैसे उपयोगांत आणावे लागले असा त्याचा अर्थ सांगितला जातो. चलनाच्या विस्ताराशीं किंवा संकोचनाशी त्याचा कांहीं संबंध नाहीं. १९४९ सालीं मात्र एकूण ११० कोटींनीं ठेवी घटल्या, त्यांपैकीं ८१ कोटींची घट चालू खात्यांतील ठेवींत असून बाकीची मुदती ठेवींतील आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बरोडा, युनायटेड कमर्शिअल बँक, इंपीरिअल बँक, इत्यादींचे १९४९ अखेरचे हिशेब प्रसिद्ध झाले आहेत. त्यांवरून निष्कर्ष काढावयाचा म्हटलें, तर हिंदी बँकांचें खेळतें भांडवल कमी होऊनहि त्यांचे नफे कायम राहिले आहेत, असें म्हणतां येईल. त्यांनीं ज्यास्त कर्जें दिलीं असलीं पाहिजेत व तीं अधिक व्याजाच्या दरानीं असलीं पाहिजेत असें अनुमान स्वाभाविकच सुचतें. त्याखेरीज वाढत्या खर्चास तोंड देऊनहि बँकांचा नफा कायम कसा राहूं शकेल ?

१९४९ च्या पहिल्या कांहीं महिन्यांत बँकांचीं कर्जें वाढलीं होतीं हें खरें आहे. डिसेंबर १९४८ अखेरचा कर्जांचा आकडा ४४० कोटी रुपये होता; तो एप्रिल १९४९ मध्यें ५०५ कोटींवर गेला होता आणि डिसेंबर १९४९ अखेरचा कर्जांचा आकडा तर ४१६ कोटींवर आला आहे. ह्याचा सरळ अर्थ असा, कीं बँकांनीं कर्जें आखडतीं घेऊन त्यांवरील व्याजाचा दर वाढविला आहे. कित्येक कारखानदारांना पक्क्या मालाच्या उठावाचे अभावीं, साचलेल्या मालाचे आधारावर कर्जें काढावीं लागलीं आणि त्याच्या व्याजाचा बोजा त्यांना सहन करावा लागला. १९५० मध्यें काय परिस्थिति राहील, ह्याचा अंदाज करतांना दोन-तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. बँकांकडील ठेवी पुनः वाढूं लागण्याचा संभव नसून कर्जास मागणी मात्र कायम रहाण्याचा रंग दिसतो. कारखानदारांच्या अडचणी कमी झालेल्या नाहींत आणि त्यांना मजुरी देण्यासहि पैशाची टंचाई भासूं लागलेली आहे. अनुत्पादक बाबींसाठी कर्जें आवश्यक झाल्यामुळें त्यांवरील व्याजाचे दरहि वाढणार हें उघड आहे. साहजीकच बँकांकडील ठेवी कमी झाल्या तरी त्यांचें उत्पन्न व नफा हीं १९५० सालींहि टिकून रहाण्यास अडचण पडूं नये. कारखानदारांना मात्र त्यासाठी ताण सोसावा लागेल. त्यांच्या अडचणींमुळें व्याजाचे दर वाढून थोड्या उलाढालींवर मोठें उत्पन्न बँका मिळवूं शकतील. अशा व्यवहारांतील धोक्यांकडे बँकांचें लक्ष रहाणें अगत्याचें आहे, हें सांगावयास नकोच.

---

### शेड्यूल्ड बँकांची देणीं व जिंदगी ह्यांचा तुलनात्मक तक्ता

(आकडे कोटी रुपयांचे आहेत)

| तारीख | एकूण ठेवी | एकूण रोकड | एकूण कर्जें | इन्व्हेस्टमेंटस |
|---|---|---|---|---|
| ३१–१२–४९ | ८५३·८९ | ११३·४३ | ४१०·६२ | ३२९·८४ |
| ३०– ९ –४९ | ८६०·१६ | ९४·८६ | ४२२·६३ | ३४२·६७ |
| १– ७ –४९ | ८७५·२१ | १०९·०३ | ४५५·९१ | ३१०·२७ |
| १– ४ –४९ | ९११·८९ | ८६·९१ | ५०१·४४ | ३२३·५४ |
| ३१–१२–४८ | ९५८·१५ | १०७.३२ | ४४२·०८ | ४०८·७५ |
| २६–१२–४७ | ९६५·८ | १४२·४४ | ४०४·५५ | ४१७·६९ |

### ठेवींशीं रोकड, कर्जें व इन्व्हेस्टमेंट ह्यांची तुलना

| तारीख | रोकडीचें प्रमाण % | कर्जांचें प्रमाण % | इन्व्हेस्टमेंटचें प्रमाण % |
|---|---|---|---|
| ३०–१२–४९ | १३·२७ | ४८·०९ | ३८·६३ |
| ३०– ९ –४९ | ११·०३ | ४९·१३ | ३९·८४ |
| १ – ७ –४९ | १३·४६ | ५२·०९ | ३५·४५ |
| १ – ४ –४९ | ९·५३ | ५५·९९ | ३२·५५ |
| ३१–१२–४८ | ११·२० | ४६·१४ | ४३·६६ |
| २६–१२–४७ | १४·७६ | ४१·९६ | ४३·२८ |

---

## पुणें सेंट्रल को. बँक

### आणि

## कै. प्रो. वा. गो. काळे

(श्री. ग. र. तुळशीबागवाले, बी. ए., एलएल. बी, बँकेचे चेअरमन, ह्यांनीं प्रो. काळे ह्यांच्या तैलचित्राच्या अनावरण प्रसंगीं भाषण केलें, त्यांत प्रो. काळे ह्यांनीं बँकेच्या केलेल्या बहुमोल सेवेची तपशीलवार माहिती सांगितली. ही हकीकत मार्गदर्शक वाटण्याजोगी असल्यानें ती येथें देत आहों.)

आपल्या बँकेच्या स्थापनेपासून कै. प्रो. काळे यांचा बँकेशीं संबंध आलेला होता. १९१७ सालीं आपली बँक नोंदण्याकरतां जो अर्ज सहकारी खात्याकडे करण्यांत आला त्यावर प्रो. काळे यांची पहिली सही आहे व प्रथम झालेल्या भागीदारांपैकी ते एक भागीदार होते. १९२९ सालच्या सुमारास त्यावेळच्या कार्यकारी मंडळांत कै. काळे यांनीं डायरेक्टर बोर्डावर काम करावें असें वाटूं लागलें, व त्या दृष्टीनें १९२९ सालीं त्यांच्याच एका शिष्याकडून असा प्रयत्नही करण्यांत आला. परंतु हा प्रयत्न कोणाकडून होत आहे याची कल्पना त्यांना न झाल्यामुळें त्यांनीं त्याविषीं ती गोष्ट विचारांत घेतली नाहीं. मात्र त्यांच्या चौकस वृत्तीमुळें हा प्रयत्न त्यांच्या एका शिष्याकडून झाल्याचें कळल्यावरून त्यांनीं पुढील वर्षीं डायरेक्टर बोर्डावर येण्याचें आश्वासन दिलें व त्याप्रमाणें २५–५–१९३१ रोजीं या बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर डायरेक्टर म्हणून ते प्रथम निवडून आले. १९३० सालचा काळ असा होता कीं, बँकेला प्रो. काळे यांच्या सारख्या खंबीर वृत्तीच्या नेत्याची व सहायाची अत्यंत आवश्यकता होती. त्याच वर्षीं ३१–५–१९३१ रोजीं त्यांची उपाध्यक्षपदावर निवड होऊन

त्याचे पुढील वर्षी २९-५-१९३२ रोजीं आपल्या बँकेचे चेअरमन म्हणून त्यांची एकमतानें निवड करण्यांत आली.

२८-५-१९३३ रोजीं पुन्हां दुसरे वर्षी त्यांचीच चेअरमन म्हणून नेमणूक झाली. तिसऱ्याही खेपेस त्यांची पुन्हा चेअरमन म्हणून निवड जवळ जवळ झाली होती पण त्यांनीं त्या मानास आपण होऊन नकार दिला. त्यापुढील दोन वर्षांच्या श्री. बापूसाहेब गुप्ते यांच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत ते साधे डायरेक्टर म्हणून मुद्दाम राहिले. अशा रीतीनें सतत मे १९३० ते सप्टेंबर १९३६ पर्यंत जवळ जवळ साडे सहा वर्षे त्यांनीं आपल्या बँकेची अत्यंत धीरानें व निस्पृहपणें सेवा केली आहे.

कै. दादासाहेब काळे यांच्या आपल्या बँकेंतील प्रामुख्यानें ज्या मोठीमुळें त्यांचें नांव या बँकेच्या इतिहासांत कायम उल्लेखिलें जाईल अशी गोष्ट म्हणजे १९३० च्या जागतिक मंदीमुळें या बँकेचे हेलकावे खाणारें तारू प्रो. काळे यांनीं मोठ्या कौशल्यानें, कठोरपणानें, धडाडीनें व खंबीरपणानें पैलतीरास नेलें. त्यांनीं चेअरमन म्हणून जें आत्मविश्वासपूर्ण ता. २८।५।१९३३ रोजीं भाषण केलें त्यावरून ही गोष्ट प्रतीत होते. त्या भाषणांत त्यांनीं थॉमस कमिटीच्या सहकारी चळवळीविरोध प्रतिकूल टीकेचा भरपूर समाचार घेतला व मंदीमुळें शेतकरी बँकांचे व्यवहार व व्यापारावर झालेले परिणाम यांचें सांगोपांग विवेचन करून त्या अडचणीवर आपण उपाययोजना कशी केली व आपत्तीच्या वेळीं बँकेनें आलेल्या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन आलेलें नुकसान कसें भरून काढलें याची माहिती देऊन बँकेची स्थिति कशी सुधारली आहे हें आत्मविश्वासपूर्ण शब्दांत दाखवून व पटवून दिलें. याच सुमारास आपली बँक ब वर्गामध्यें कांहीं दिवस होती पण प्रो. काळे यांनीं सहकारी खात्याला सर्व गोष्टी पटवून व खात्री करून देऊन बँकेचा सतत असलेला अ वर्ग त्यावेळेस कायम ठेवला. भागिदारांचा व जनतेचा विश्वास कै. काळे यांनीं संपादन करून तो कायम राखिला ही फार मोठी गोष्ट होय. पुढील वर्षी ता. २७-५-१९३४ रोजीं त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत शेती-मालाचे बाजारभाव चढविण्याच्या बाबतींत सरकारकडून प्रयत्न होत नाहींत याबद्दल खणखणीत टीका करून आपल्या बँकेनें व्याजाचे दर कमी करणें व योग्य त्या सोसायट्यांस सूट देणेचें धोरण जाहीर करून मध्यंतरी बंद पडलेला कोठार व्यवहार-रेंही पुन्हा सुरू करणेची खटपट करणेचें आश्वासन दिलें. समारोपाचे भाषणांत त्यांनीं आपण काय करावयास पाहिजे हें सांगतांना बँकेची परिस्थिति जरी आज चांगली आहे तरी त्याहीपेक्षा ज्यास्त मजबुती यावयास पाहिजे असें बजाविलें. आपल्या भांडवलायेवढा रिझर्व्ह फंड झाला पाहिजे, असें उद्दिष्ट सांगून निरनिराळे सीक्रेट रिझर्व्हज आपण कसे वाढविले पाहिजेत याबद्दी धोरण आखून दिले. त्यावेळच्या २१-५-१९३३ च्या बोर्डाचा त्यांचेबद्दलचा ठराव उल्लेखनीय आहे तो असा कीं, गेल्या वार्षिक साधारण सभेंत बोर्डातर्फे दिलेली आश्वासनें पार पाडून गेले वर्षी प्रो. काळे यांनी योग्य तो मार्ग दाखवून बँकेच्या खातेदारांचा विश्वास पूर्णपणें संपादन केला ही गोष्ट हें बोर्ड नमूद करून ठेवीत आहे.

मे. बोर्डाने पुढील वर्षी दि. ता. ३०-५-१९३४ रोजीं असाच गौरवपूर्ण ठराव करून बँकेचें स्थैर्य पूर्ववत कायम ठेविलें याबद्दल अभिनंदन व समाधान व्यक्त केलें आहे. सर्वसाधारण सभेनेंही २७-५-१९३४ रोजीं ठराव केला, तो असा कीं, आपल्या बँकेचे माजी चेअरमन श्री. प्रो. वामन गोविंद काळे यांनीं गेल्या दोन वर्षांच्या अडचणीच्या काळांत बँकेच्या इभ्रतीस कोणत्याही प्रकारें कमीपणा येऊं न देतां नेटानें व उत्साहानें काम पार पाडिलें याबद्दल सर्व सभासद त्यांचें अभिनंदन करीत आहेत. तसेंच आज त्यांनीं आपण होऊन चेअरमनची सूचना परत घेतली व श्री. बापूसाहेब गुप्ते यांना या जागेचा मान मिळवून दिला याबद्दल ही सभा त्यांचें अभिनंदन करीत आहे.

त्यांच्या कारकीर्दीत बँकेचें खेळतें भांडवल व गंगाजळी त्याही परिस्थितींत मोठ्या संख्येनें वाढली आहे. सर्व प्रकारच्या ठेवींच्या रकमेंतही वाढ झाली होती. खर्चाचें मान कमी होऊन नफाही कमी न होतां डिव्हिडंडही पहिल्याप्रमाणें भागिदारांना देणेंत आले. एकंदर बिकट परिस्थितीमध्यें तोल सावरून बँकेचा खंबीरपणा कायम आहे हें खातेदारांच्या व जनतेच्या नजरेंत पूर्णपणें भरून राहिलें. कै. दादासाहेब काळे यांच्या कारकीर्दीत बँकेच्या सासवड, फरग्युसन कॉलेज येथें शाखा काढण्यांत आल्या. ओगलेवाडी येथें नवीन केंद्र उघडण्यांत आलें व बँकेच्या इमारतीवरील दुसरा मजला बांधण्याची योजनाही बोर्डात मंजूर झाली.


बँकेच्या प्रत्यक्ष कारभारांतून निवृत्त झालेनंतर सुद्धां कै. दादासाहेब काळे यांचा बहुमोल सल्ला वेळोवेळीं घेणेंत येत असे. १९४४ सालच्या सहकारी सप्ताहाचें उद्घाटन त्यांच्या हस्तें याच ठिकाणीं झालें होतें. त्यावेळीं त्यांनीं आपल्या भाषणांत व्यक्तीस्वातंत्र्य हें सहकाराचें आद्य तत्त्व आहे, अनेकांचे स्वातंत्र्यांत आधारलेली शक्ती हीच सहकारी शक्ती व त्याच शक्तीची वाढ व प्रचार करणें हेंच सहकारी दिनाचें व सप्ताहाचें मुख्य तत्त्व आहे हें सांगून आपल्याकडे जिवंत संस्था किती आहेत, त्यांची वाढ होणें हेंच खरें सहकारी चळवळीचें यश आहे असें तत्त्वज्ञान अत्यंत कळकळीनें व तळमळीनें प्रकृति बरी नसतांही प्रतिपादन केलें.




देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी २ डाळीची गिरणी ३ उसाचे चरक
४ चक्क्या ५ गोल करवत (लाकडे कापण्याकरितां) ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लिमिटेड
भिवंडी जि. ठाणे
व्हाया-कल्याण (जी. आय. पी. रेल्वे)

## इनकम टॅक्स चुकविणारांची कार्यपद्धति

इनकम टॅक्स ॲक्ट आणि एक्सेस प्रॉफिट्स टॅक्स ॲक्ट यांच्या कलमांविरुद्ध वागून, हे कर कशा रीतीनें आणि कितपत चुकविले जातात, ह्यासंबंधीं चौकशी करण्यासाठी सरकारनें इनकम टॅक्स इनव्हेस्टिगेशन कमिशनची नेमणूक केली होती. ज्या लोकांनीं वरील कर भरावयास पाहिजे होते परंतु भरले नाहींत, त्या कराची माहिती उजेडांत आली तर प्रामाणिकपणानें कर भरणारांवरील निष्कारण पडणारा बोजा साहाजिकच कमी होईल. परंतु सरकारनें मोठ्या कर चुकारांना सार्वत्रिक माफी देण्याच नुकतेंच जाहीर केलें आहे. सरकारच्या ह्या धोरणामुळें प्रामाणिकपणानें कायद्याचें पालन करणाऱ्यांचा विश्वासघात केल्यासारखें होत नाहीं काय? निरनिराळ्या उद्योगधंद्यांत सामान्य नागरिकांनीं आपलें भांडवल गुंतविलेलें असतें. त्यांच्या दृष्टीनें सुद्धां ह्या प्रश्नाला महत्त्व आहे.

एखाद्या कारखान्याला झालेला नफा कमी दाखवावयाचा असला तर एक अगदीं सोपा मार्ग असतो. तो म्हणजे कारखान्याला लागणाऱ्या कच्च्या मालाचा वाजवीपेक्षां अधिक खर्च दाखविणें. ज्या कंपन्यांकडून हा माल घ्यावयाचा असतो त्यांची खोटीं बिलें तयार करून वस्तुतः न घेतलेल्या मालाची खरेदी दाखविता येते. हिशेबांत बिलांची रक्कम रोखीनें दिलेली अर्थातच दाखविण्यांत येते. हा माल कारखान्यांत वापरण्यासाठीं दिलेला दाखविला जातो. अशा रीतीनें खोट्या नोंदी करून नफ्याची रक्कम हवी तितकी कमी दाखविता येते. ही रक्कम मग चालकांच्या खिशांत जाते हें सांगणें नकोच. ह्या पद्धतीचा परिणाम असा होतो:—

( अ ) नफा कमी झालेला दाखविला म्हणजे सरकारला त्यावर एरव्हीं मिळणाऱ्या कराला मुकावें लागतें.

( ब ) धंद्याची भरभराट असतांना जो वरकड पैसा मिळतो त्याचा विनियोग, धंद्याचा विस्तार करण्याकडे किंवा नवीन यंत्रसामग्री घेण्याकडे वास्तविक करावयाचा असतो. कंपनीला झालेला पण न वाटलेला नफा भांडवलाच्या खातीं जमा करून हें करतां येतें. कंपनीचे कांहीं भाग विक्रीला न काढलेले असे असले, अगर विक्रीला काढलेल्या भांडवलापैकीं भागांची सर्वच्या सर्व रक्कम घेतलेली नसेल तर, साठलेल्या नफ्याचा उपयोग करून हे सर्व भाग पूर्णपणे पेड–अप झाल्याचें दाखवितां येतें. एखाद्या कंपनीला आपलें नॉमिनल भांडवल वाढविण्याचा अधिकार असेल तर तें तसें वाढवून, सांठलेल्या नफ्याचा उपयोग नवीन भागासाठीं करता येतो. ह्या व्यवहारांत वास्तविकरीत्या नफ्याचें नव्या भांडवलांत रूपांतर झालेलें असतें. अर्थातच कंपनीच्या त्यावेळच्या भागीदारांना सांठलेल्या नफ्यांतून पैसे न मिळता, जुन्या भागांपैकीं अगर नव्या भागांपैकीं भाग मिळतात. अशा भागांमुळें भागीदारांना रोख नफा मिळत नाहीं. कारण त्यांच्यामुळें कंपनीची वाटण्यासारखी मालमत्ता मोकळी होत नाहीं. नफ्याचें रूपांतर भांडवलांत झालेलें असल्यामुळें भागीदारांना फक्त भागांचें सर्टिफिकेटच काय तें मिळतें.

( क ) अशा रीतीनें नफा कमी दाखविल्यामुळें, धंद्याची स्थिती सुधारण्यासाठीं वापरता येण्यासारख्या पैशाला कंपनी मुकते, इतकेंच नव्हे तर कंपनीची आर्थिक शक्ति घसरणीला लागून रोजच्या व्यवहारासाठीं तिला बँकांकडून जबर व्याजाच्या दरानें कर्ज काढावें लागतें. ह्या व्याजामुळें कंपनीचा नफा खालावतो आणि तिची आर्थिक परिस्थिति अधिकच खालावते. नफा कमी दाखविण्याच्या ह्या पद्धतीमुळें भागीदारांना वाढता नफा, बोनस शेअर्स, अगर भागांच्या किंमतींत झालेली वाढ इत्यादि फायदा मिळत नाहीं.

( ड ) कच्च्या मालाच्या खोट्या खरेदीच्या नोंदीमुळें, त्या मालाची किंमत कंपनी तयार करीत असलेल्या वस्तूंवर पडते आणि त्यांची उत्पादनाची किंमत त्या प्रमाणांत वाढते. ह्या प्रकाराचें एक उदाहरण देण्यासारखें आहे. हिंदुस्थानचें युद्धकालीन सरकार एका कंपनीकडून 'पेपर बोर्डस्' विकत घेत असे. ह्या कंपनीनें दाखविलेली उत्पादनाची किंमत फार आहे असें सरकारला वाटूं लागलें. म्हणून त्यानें आपला एक कागदाच्या धंद्याचा तज्ज्ञ कंपनीकडे तपासासाठीं पाठविला. पण काय? त्याला कच्च्या मालाच्या खोट्या खरेदीचीं बिलें दाखविण्यांत आलीं आणि उत्पादनाची किंमत योग्य तीच दाखविण्यांत आली आहे अशी त्याची खात्री करण्यांत आली. ( अपूर्ण )

### नफ्याची दृष्टी आधीं, वाचकांच्या आवडीचा दर्जा मागून.

इंग्लंडमधील सुप्रसिद्ध "स्ट्रँड" हें मासिक लवकरच बंद करण्यांत येणार आहे. जॉर्ज न्यून्स लि. ह्या प्रकाशन संस्थेतर्फे अनेक यशस्वी नियतकालिकें प्रसिद्ध होतात आणि "स्ट्रँड" हें मासिकहि त्या कंपनीचेंच आहे. ह्या कंपनीला गेल्या वर्षी ५,२६,०९२ पौंड निव्वळ नफा (कराची तरतूद करून) झाला हाता; तेव्हां तिला "स्ट्रँड" मासिक सुधारून तें किफायतशीर चालविणें अशक्य होऊं नये. प्रकाशन संस्था ही एक धंदेवाईक संस्था असून तिचे व्यवहार किफायतशीर झाले पाहिजेत हें उघड आहे; परंतु वाचकांच्या आवडीच्या दर्जाचीहि ती एक प्रकारची विश्वस्त असते. तथापि, जॉर्ज न्यून्स लि. नें "स्ट्रँड" हें उच्च दर्जाचें मासिक बंद करून हलक्या आवडीस पोसणाऱ्या "लंडन ओपिनियन" व "मेन ओनली" ह्या आपल्या दोन मासिकांकडे जास्त लक्ष देण्याचें ठरविलें आहे.

### भिवंडी वीव्हर्स को. सोसायटी लि., भिवंडी

वरील सोसायटीनें आपलें भांडवल आतां ५३,३२५ रु. पर्यंत वाढवलें आहे. रिझर्व्ह फंड ३५,६१४ रु., बिल्डिंग फंड ३३,००० रु., धर्मादाय फंड १२,१७९ रु., बॅडडेट फंड ३,६४१ रु., डेव्हलपमेंट फंड १०,००० रु. असे फंडांचे आकडे आहेत. सोसायटीच्या व्यवहारांत बरीच वाढ झाली, तरी सरकारच्या वेळोवेळ बदलणाऱ्या धोरणामुळें सुताचा उठाव होऊं शकला नाहीं. व्याज मात्र जबर द्यावें लागलें. फक्त विणकर वर्गाच्या हिताकडेच लक्ष देऊन संस्थेनें काम केलें. बँकेचा 'अ' वर्ग कायम आहे. सोसायटीनें अगदीं बाजार वस्तींत ५०,००० रु. ची इमारत खरेदी केली आहे. १९२७ सालीं स्थापन झालेल्या ह्या सोसायटीची १९२३ नंतर विशेष प्रगति झाली असून ती अहवालाचे वर्षीहि कायम राहिलेली आहे. ( चेअरमनः मे. महंमद युनुस अबदुल समद; मॅनेजरः मे. एस. एन. लाठोरे. )

### खेडेगांवांतील कर्जवसुलीचा बळी

विजयवाडा को. से. बँकेचा एक सुपरवायझर खेड्यांतील बँकेची येणीं वसूल करण्यासाठीं गेला असतांना मध्यरात्रीं तो झोपला असतेवेळीं कांहीं हत्यारी लोकांनीं त्याचेवर हल्ला केला आणि त्याला व ज्या घरीं तो उतरला होता त्याच्या मालकाला ठार केलें.

## राजकन्या मार्गारेटच्या विवाहाबाबत कायद्यांतील तरतुदी

प्रिन्सेस एलिझाबेथची धाकटी बहीण प्रिन्सेस मार्गारेट हिनें अमेरिकन तरुणाशीं विवाह करण्याचें योजलें, तर काय होईल? असा प्रश्न मार्गारेट अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहे ह्या बातमीमुळें तेथें व इंग्लंडमध्यें विचारला जात आहे. तिला तिच्या विवाहाचे बाबतींत स्वातंत्र्य कितपत आहे? ब्रिटिश राजघराण्यांतील सर्वांवर १७७२ चा रॉयल मॅरेज ॲक्ट बंधनकारक आहे. वयाच्या २५ व्या वर्षापूर्वी त्यांपैकीं कोणासहि विवाह करावयाचा असेल तर त्यानें प्रथम राज्यकर्त्या राजाची संमति मिळविली पाहिजे, असें तो कायदा सांगतो. ही संमती न घेता केलेला विवाह बेकायदा आहे. तेव्हां, मार्गारेटनें अमेरिकेहून परत आल्यावर, आपला पति निवडल्याचें तिनें राजास सांगितलें तर राजाला विचार करून आपला निर्णय त्याबाबत द्यावा लागेल. कारण, हा निर्णय बहुसंख्य नागरिकांना पसंत पडेल, इतकेंच नव्हे तर इंग्लंडच्या मित्र राष्ट्रांनाहि तो मान्य होईल, ह्याची पूर्व चौकशी त्याला करावी लागेल. अमेरिकन जांवई करण्यास राजाला कोणताच प्रतिबंध नाहीं; तो राजघराण्यांतला असला पाहिजे असा कांहीं नियम नाहीं. परंतु, ब्रिटिश राजघराण्यांतील कोणासहि प्रॉटेस्टंटांखेरीज इतरांशीं विवाह करता येत नाहीं. तेव्हां, मार्गारेटचा पति रोमन कॅथॉलिकच असावा लागेल. २५ वें वर्ष पुरें झाल्यावर मार्गारेटनें केलेल्या विवाहास राजाची संमति कायद्यानें आवश्यक उरणार नाहीं, परंतु तिला प्रीव्ही कौन्सिलला एका वर्षाची नोटीस द्यावी लागेल आणि पार्लमेंट तो विवाह थांबवूं शकेल. अमेरिकेच्या लंडनमधलि वकिलाची मुलगी शर्मन डग्लस, हिची व मार्गारेटची मैत्री आहे आणि ह्या मैत्रिणीनें मार्गारेटला अमेरिकेस येण्यासाठी निमंत्रण दिलें आहे. तेथलि श्रीमंत तरुणांच्या कित्येक मातांनीं, आतांपासूनच मार्गारेटच्या प्रवासाबद्दल औत्सुक्य दाखविण्यास प्रारंभ केला आहे!

---

### साखरेच्या धंद्याच्या संरक्षणाची मुदत वाढ

साखरेच्या धंद्यास दिलेल्या संरक्षणाची मुदत ३१ मार्च १९५० अखेर संपते. हें संरक्षण तीन वर्षें वाढविण्यांत यावें, अशी टॅरिफ बोर्डाची शिफारस आहे, असें वृत्त कानपूर येथून बाहेर पडलें आहे.

---

### परवाऐवजी काल चोरी झाली, म्हणून बरं.

"रात्रीं तुमचं दुकान फोडण्यांत आलं असं आज वर्तमानपत्रांत वाचलं. किती नुकसान झालं?"

"झालं थोडसं. परंतु कालच्या ऐवजी परवा चोरी झाली असती तर मात्र तें ज्यास्त झालं असतं."

"तें कां?".

"कालच मी सगळ्या मालाच्या किंमती २० टक्के उतरवल्या आहेत."

### सॉलिसिटरची फी

"गेल्या महिन्याच्या पांच तारखेस दोनदा सल्ला दिल्याबद्दल तुम्हीं बिल आकारल आहे, परंतु मी इथं एकदांच आलों होतों."

"तो दिवस शुक्रवार होता मला वाटतं. त्या दिवशीं बराच पाऊस होता का?"

"हो, होता."

"तुम्हीं गेल्यावर पुनः आला आणि छत्री राहिली आहे का, असं मला विचारलं; आठवत नाहीं तुम्हांला?"


## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

(स्थापना सन १९२७)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,९३,५०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,१४,१३० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,५४३ रु. |
| खेळतें भांडवल | १५,५१,०८८ रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार

या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेश्वर, मॅनेजर — म. अं. दप्तरदार, बी. ए., चेअरमन.



## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरीः— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
(मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली)

स्थापन साल १९११.

चेअरमनः—श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. २०,६२,२५० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २९,३८,२०० |
| ठेवी | रु. ७,४७,०९,९०० |
| खेळतें भांडवल | रु. १०,६३,००,००० |

प्रांतांतील बारा जिल्ह्यांमध्यें ५६ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तींबद्दल मुख्य कचेरीकडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## हिंदी पोस्ट आणि तार खात्याचा १९४८-४९ चा अहवाल

पोस्ट आणि तार खात्याच्या १९४८-४९ च्या वार्षिक अहवालावरून या खात्याच्या सर्व पोस्ट कचेऱ्यांनीं मिळून एकूण २२ कोटी ६४ लक्ष टपाल वस्तूंची ( आर्टिकल्स ) उठाठाल केली. यांत ७ कोटी २२ लक्ष रजिस्टर्ड वस्तूंचा समावेश होतो. तसेंच या खात्यानें १५० कोटी रुपयांच्या ४ कोटी ४९ लक्ष मनीऑर्डरी केल्या आणि ३४ कोटी रुपये व्ही. पी. पी. नें जमा केले. गेल्या वर्षीचे हेच आंकडे अनुक्रमें २१ कोटी ३३ लक्ष एकूण वस्तू, ६ कोटी ७६ लक्ष रजिस्टर्ड वस्तू, ४ कोटी ४७ लक्ष मनीऑर्डरी आणि ३३ कोटी रुपये व्ही. पी. पी. नें जमा असे होते. तसेंच या काळांत २ कोटी ७१ लक्ष तारा व बाहेर जाणारे ४४ लक्ष ट्रंक कॉल्स पाठविण्यांत आले. या वर्षाअखेर टेलिफोन्सची एकूण संख्या १ लक्ष २० हजार होती. ह्या खात्यास एकूण २९,४७,६६,५१६ रुपये उत्पन्न झालें तर २६,८८,९१,२१४ रुपये खर्च आला. अशा प्रकारें एकूण २,५८,७६,२९२ रुपये फायदा झाला. या खात्याचा झालेला १,६५,४५,०२९ रुपये भांडवली खर्च मुख्यतः ट्रंक लाइन्स व नवीन टेलिफोन एक्सचेंजीस यांवर झाला.

### प्रायोगिक कचेऱ्या

३१, मार्च १९४९ पर्यंत देशांत प्रायोगिक कचेऱ्या सोडून एकूण २०,५१७ पोस्ट कचेऱ्या होत्या. यांपैकीं लहानमोठ्या शहरांत ३८४२ व खेड्यापाड्यांत १६,६७५ होत्या. या काळावधींत प्रायोगिक पद्धतीवर एकूण ३,७५३ पोस्टकचेऱ्या उघडण्यांत आल्या. यांतील ३,११३ खेड्यापाड्यांत उघडण्यांत आल्या. या प्रयोगाद्वारा सुरू करण्यांत आलेल्या पोस्ट कचेऱ्यांतील १९३ कचेऱ्या कायम करण्यांत आल्या, ४३९ बंद करण्यांत व ६,२४३ कचेऱ्या अजूनही प्रायोगिक म्हणून चालूं आहेत. देशांतील पत्रांच्या पेट्यांची एकूण संख्या ९८,०८९ होती.

या वर्षी डेड लेटर ऑफिसनें १,५५,१३,००० वस्तू निकाली काढल्या. मागील वर्षी हाच आंकडा २,३३,६८,००० इतका असल्यानें या वर्षी सदरहू वस्तूंत ३३·६ टक्क्यांनीं घट झाली. असल्याचें दिसून येतें. डेड लेटर ऑफिसनें उघडलेल्या वस्तूंत इतर गोष्टींबरोबरच चेक, हुंड्या, चलनी नोटा आणि इतर प्रकारची मालमत्ता होती. या मालमत्तेची एकूण किंमत सुमारें २४,६२,००० रुपये इतकी होती.

### राष्ट्रीय बचत रोखे

या कालावधींत राष्ट्रीय बचत रोख्यांत एकूण २२ कोटी ६७ लक्ष रुपये गुंतविण्यांत आले. मागील वर्षी हाच आंकडा २० कोटी ३५ लक्ष रुपये होता. त्यामुळें प्रस्तुत वर्षी राष्ट्रीय बचत रोख्यांत गुंतविलेल्या रकमेंत ११·४ टक्क्यांची वाढ झाल्याचें दिसून येतें. ७ आणि ५ वर्षे मुदतीचे नवीन बचत रोखे सुरू केल्यामुळें वरील वाढ झाली.

---

**एंजिनिअरिंग कारखान्याला कर्ज**—पाण्याचे पंप तयार करणाऱ्या एका कारखान्याला ३,६५,००० रुपये कर्ज म्हणून देण्याचें मध्यप्रांत सरकारनें ठरविलें आहे. ह्या कारखान्यांत तयार होणारे पंप तगाई कर्जाच्या योजनेप्रमाणें शेतकऱ्यांना देण्यांत येणार आहेत. अधिक धान्य पिकविण्याच्या कार्यक्रमांतील हा एक भाग आहे.


## सी. पी. अँड बेरार (मध्यप्रदेश) प्रोव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर.

स्थापना:—१९१२.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. १०,२४,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ११,१६,००० |
| खेळतें भांडवल | रु.२,४९,६४,००० |

अध्यक्ष:— सर माधवराव देशपांडे, के. बी. ई.

बँकिंगचे सर्व व्यवहार होतात.

बँकेचे शेअर्सची विक्री चालूं आहे. गेल्या ४ वर्षांची मुनाफा वांटणी पांच दरानें केली.

सरकारची पूर्ण हमी असलेले शेंकडा तीन व्याजाच्या दराचे रोख्यांची विक्री चालूं आहे. रोख्यांची मुदत १० व १५ वर्षांनीं भरेल.

विमा कंपन्या, बँका, म्युनिसिपालिट्या, शाळा, जमीनदार वगैरेंनीं वरील रोखे जरूर खरेदी करावेत.

गो. आ. भोंसुले,
मॅनेजर.

## धी बँक ऑफ सिटिझन्स लि.

स्थापना १९३७

मुख्य कचेरी: १५१४ मारुती गल्ली, बेळगांव.
शाखा: बेळगांव, धारवाड, विजापूर व कारवार जिल्ह्यांतील मुख्य ठिकाणीं.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १०,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | ७,००,००० रु. |
| भरलेलें भांडवल | ३,४७,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० रु. |
| खेळतें भांडवल | ३६,००,००० रु. |

जनरल मॅनेजर
बँक ऑफ सिटिझन्स लि.
बेळगांव.

## THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA

# NOTICE.

Notice is hereby given that an Extra-Ordinary General Meeting of the Share-holders of the Bharat Industrial Bank Ltd., will be held at the Registered Office of the Bank, at 15 Shukrawar Peth, Poona City on Saturday the 11th March, 1950 at 4 P. M. when the following resolution will be moved as special resolution :—

Resolved that the following Articles are hereby amended as follows :—

A. Article 3—delete "chapter X-A of the Indian Companies Act 1913-36" and substitute "The Banking Companies Act 1949" in its place.

B. Article No. 8 (a)—delete the present Article and substitute the following article in its place.

8 (a) "The Company may at any time pay a commission to any person for subscribing or agreeing to subscribe (whether absolutely or conditionally) any shares in the company or agreeing to procure subscriptions (whether absolute or conditional) for any shares in the Company, so that if the commission shall be paid or payable out of capital, the statutory conditions and requirements shall be observed and complied with, and the commission shall not exceed 2½ (Two and one half) per cent on the paid-up value of shares. In case of debentures, if any, the commission shall not exceed ten per cent and such commission or brokerage may be paid either in cash, debentures or share or shares of the Company, credited as fully or partly paid, as the case may be.

C. Article 51 page 9—Substitute "annas four per share" for Rupee one in the first line and "forty" for "three" in the beginning of the third line. Similarly delete from the word "three" in third line upto "re gistration of shares" and substitute the following in its place "forty, no additional fee shall be charged and such fee shall, if so required by the Directors, be paid before registration of the shares."

D. Article 89 (a)—Add the following sentence in the present Article at the end. "However the maximum number of votes to which any one share-holder will be entitled will not exceed 5 per cent of the total voting rights of all the shareholders."

E. Article 108, line 4—Delete from the word "either" from line four upto "offices" in the fifth line and add "for a period not exceeding five years" in that place.

F. Article 139 (8) page 22—Delete "without prejudice" from the 1st line upto "there under" in the third line and begin the Article with "To appoint...etc."

G. Article 186—Delete clauses 186 (a) (3) and 186 (b) on page 32.

By order of the Board,
R. B. Salvekar,
N. N. Kshirsagar.
Managing Directors.

15, Shukrawar, Poona 2,
14th Feb. 1950.

---

## THE BANK OF MAHARASHTRA LTD.

# NOTICE TO CONTRACTORS

Sealed Tenders in B-2 (Item Rate) form are invited for constructing "Bank Building" for the Bank of Maharashtra Ltd., Poona 2, estimated to cost approximately Rs. 2,50,000/- and will be received by the Manager of the Bank in his office up to 3 P. M. on 18th February 1950 and will be opened on the same day. Rs. 2,500/- should be paid in cash as earnest money along with the Tender, which should be accompanied by a solvency certificate or Banker's certificate of his financial stability without which the Tender will not be considered.

Blank Tender forms can be obtained from 9th February 1950 to 16th Feb. 1950 on payment of Rs. 10/- per set from the Manager during Office hours on all working days from 10-30 A. M. to 2-30 P. M. on week days and from 10-30 A. M. to 1 P. M. on Saturday. Detailed plans and estimates could be seen in Bank's Office on Laxmi Road during Office hours on any working day.

The Contractors shall quote the rates in words and figures. The rates and amounts of cash items should be worked out and the requisite total given at the end. No alteration in the form of Tender or in the schedule of quantities nor any addition thereto will be permitted.

Tenders which do not fulfil any of the above conditions or those printed on the tender form and are incomplete in any respect will be rejected.

Acceptance of the Tender will rest with the Board of Directors of the Bank who reserve the right of rejecting any or all Tenders without assigning reasons.

The Bank of Maharashtra, Ltd.,
Laxmi Road, Poona 2.
Poona, 2nd Feb. 1950.

C. V. Joag.
Manager

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

ताळेबंदांतील प्रमुख आंकडे

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १६,००,००० | कॅश | २२,८७,०७८ |
| रिझर्व्ह फंड | ३,८०,००० | बँकांकडील शिल्लक | ९,८५,२१८ |
| कॉन्टिन्जन्सी फंड | ५०,००० | इनव्हेस्टमेंटस | ७९,५५,७२५ |
| ठेवी | २,०८,८३,२२४ | कर्जे | १,१०,७८,७१७ |
| नफा-तोटा खातें | २,५५,५९७ | इमारत व सेफ डि. व्हॉल्टस | ३,९१,३४६ |

नफ्याची सुचविलेली वाटणी

| | रु. |
|---|---|
| रिझर्व्ह फंडांत | ४१,००० |
| कराची तरतूद | ८५,००० |
| ५% करमाफ डिव्हिडंड | ८०,००० |
| पुढील हिशेबांत | ४९,५९७ |
| नफा वाटणीची रक्कम | २,५५,५९७ |

बँकेची इमारत बांधण्यासाठी टेंडर्स मागविण्यांत आलीं आहेत. इमारतीची अंदाजी किंमत २,५०,००० रु. होईल.

---

### सातारा जिल्हा लँड मॉर्गेज बँकेची सांगली येथें कचेरी

पूर्वी जाहीर झाले प्रमाणें सातारा जिल्हा को. ऑ. लँड मॉर्गेज बँक लि. कराड या बँकेची विशेष साधारण सभा रविवार तारीख ५-९-५० रोजीं दुपारी ३ वाजतां होऊन पुढे ठेवलेले सर्व पोट नियम मंजूर करण्यांत आले. विशेषतः दक्षिण सातारा जिल्हा इतःपर बँकेच्या कार्यक्षेत्रांत येत असलेमुळें तिकडील शेतकरी बांधवांच्या सोई करितां सांगली येथें बँकेचें ऑफिस उघडण्याबाबत जनरल सभेनें ठराव करून त्याकरितां लागणाऱ्या खर्चाचें बजेटही मंजूर करण्यांत आलें. सदरहू ठरावास अनुसरून सांगली येथें लवकरच बँकेचें ऑफिस उघडण्यांत येईल. जनरल सभेचे वेळीं बँकेचे चेअरमन रावसाहेब आ. ना. कल्याणी यांनीं आपले भाषणांत बँकेच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन शाखा उघडण्याचें काम बँकेला अतीशय खर्चाचें होणार आहे. तरीपण दक्षिण सातारा जिल्ह्यांतील शेतकरी बांधवांची गरज भागली जावी व त्यांना सोईचें पडावें म्हणून बँक आर्थिक झीज सोसूनही सांगली येथें शाखा उघडण्यास तयार झाली आहे याचें विवेचन केलें. उत्तर सातारा जिल्ह्यांतील विलीन संस्थानचा मोठा भाग समाविष्ट झालेने व विशेषतः फलटण संस्थानांतील लोकांना सोईचें पडावें म्हणून लोणंद अगर नीरा या ठिकाणीं बँकेस लवकरच एक शाखा उघडावी लागणार आहे.

---

### १९५० मध्यें ४० बँकांची तपासणी होणार

बँकिंग कंपनीज कायद्यानें सांगितल्याप्रमाणें सर्व लहानमोठ्या बँकांची तपासणी करण्यास रिझर्व्ह बँक प्रारंभ करणार आहे. सध्या ही तपासणी करण्यास आवश्यक तेवढा तज्ज्ञ नोकरवर्ग बँकेजवळ नसल्यानें, १९५० मध्यें सबंध भारतांतील फक्त ८ शेड्यूल्ड बँका व ३२ बिगर शेड्यूल्ड बँका एवढ्यांचीच तपासणी केली जाईल. तपासण्या हळुहळु वाढवीत जाऊन १९५२ अखेर सर्व बँकांची एक तरी तपासणी पुरी करण्याचा रिझर्व्ह बँकेचा बेत आहे. रिझर्व्ह बँकेकरवी बँकांची तपासणी ही आतां नित्याची बाब होणार असल्यानें एखाद्या बँकेची तपासणी सुरू झाल्यावरून केवळ, तिचेसंबंधीं प्रतिकूल कल्पना कोणीही करून घेऊं नये.

### सहकारी साखर कारखान्यास सरकारचें कर्जाऊ शेअर भांडवल

दि बागाइतदार को. शुगर प्रोड्यूसर्स सोसायटी (फॅक्टरी) लि. ढोणी, ह्या सोसायटीचें तिनें जमविलेल्या शेअर भांडवला इतकें, परंतु ६ लक्ष रुपयांपेक्षा ज्यास्त नाहीं, इतकें शेअर भांडवल विकत घेण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. सोसायटीनें ५ वर्षांनीं सरकारचें भांडवल परत करावयास हरकत नाहीं, परंतु तिचें स्वतःचें शेअर भांडवल त्यामुळें १६ लाखांचे खालीं जाता कामा नये. सोसायटीनें इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनकडून कर्ज मिळविलें आहे ते फेडल्यानंतर तीन वर्षांत, कांहीं झालें तरी, सोसायटीनें तीन समान वार्षिक हप्त्यांत सरकारचें शेअर भांडवल परत केलें पाहिजे. सोसायटीनें सरकारच्या पूर्व मंजुरीशिवाय कोणतींहि डिबेंचर्स काढतां कामा नयेत व कर्ज घेतां कामा नये आणि ४% पेक्षा ज्यास्त डिव्हिडंड दिलें न पाहिजे. सरकार घालून देईल त्या पद्धतीनें डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंड काढण्यास हरकत नाहीं. सरकारचे सोसायटीच्या बोर्डावर तीन प्रतिनिधी रहातील आणि मॅनेजिंग डायरेक्टराच्या नेमणुकीस सरकारी मंजुरी लागेल.

### फलटण शुगर वर्क्स, लि.

वरील कंपनीनें ३० सप्टेंबर १९४९ अखेर संपलेल्या वर्षी ४० लक्ष रु. भांडवल, २८ लक्ष रु. रिझर्व्हज व ८ लक्ष रु. कर्जें ह्यांवर २३ लक्ष रुपये नफा मिळविला. प्रत्येक भागास ७ रु. (१४%) डिव्हिडंड जाहीर झालें आहे. ३० सप्टेंबर रोजीं उसाचें उभें पीक ४,०५० एकर होतें. एप्रिलमध्यें ऑइलमिल सुरू झाली.

---


# NOTICE.

**The Bharat Industrial Bank Ltd., Poona.**

Notice is hereby given that the 12th Ordinary Generl Meeting of the Shareholders of the Bharat Industrial Bank Ltd., Poona will be held on Saturday, the 11th March 1950 at the Registered Office of the Bank, 15, Shukrawar Peth, Poona, at 5 P. M. to transact the following business.

1. To receive and consider the Report of the Directors, Audited balance sheet and Profit and Loss Account for the period ending 31st December 1949.

*2. To declare dividend.

3. To elect Directors in places of the retiring Directors who are eligible for re-election.

4. To appoint Auditors and fix up their remuneration.

5. To transact such business as may be allowed by the Chairman.

By order of the Board.
N. N. Kshirsagar.
R. B. Salvekar.
Managing Directors.

Poona, 14th February 1950.
15, Shukrawar Peth, Poona 2.

*N. B.*—The Transfer Books of the Bank will be closed from 7th March 1950 to 21st March 1950 both days inclusive.

*The dividend when sanctioned will be payable on and after 1st April 1950. The dividend warrants will be posted to the registered addresses of the Share-holders.

## पुणें जिल्हा खरेदी-विक्री संघ लि., पुणें

### शेतकी विभागाचा उद्घाटन समारंभ

शेतकऱ्यांच्या मालाची विक्री आणि त्यांना व ग्राहक सहकारी संस्थांना लागणाऱ्या जिनसांचा पुरवठा करण्याकरितां संघातर्फे सुरू करावयाच्या शेतकी विभागाचा ( अडत दुकान ) उद्घाटन समारंभ विकास मंत्री ना. नाईक निंबाळकर ह्यांच्या हस्तें संस्थेच्या जागेंत, भवानी पेठेंत, ता. १२ फेब्रुवारी रोजीं झाला.

### मि. लॅमिंग ह्यांची मुं. प्रां. स. इन्स्टिटयूटला भेट

इंटर नॅशनल लेबर ऑफिस, जिनीव्हाच्या कोऑपरेशन व हॅंडिक्रॅफ्ट विभागाचे प्रमुख मि. जी. एन. लॅमिंग, ह्यांनीं ७ फेब्रुवारी रोजीं मुं. प्रां. सहकारी इन्स्टिटयूटला भेट दिली. मुंबई प्रांतांतील व भारतांतील सहकारी चळवळीच्या प्रगतीबाबत त्यांनीं इन्स्टिटयूटच्या एक्झिक्युटिव्ह कमिटीच्या सभासदांशीं चर्चा केली.

### बँक्स ट्रायब्यूनलचें काम तहकूब

ऑल इंडिया इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल ( बँक डिस्प्यूट्स ) हें जून १९४९ मध्यें नेमण्यांत आलें आणि त्याचें काम चालू आहे. परंतु ट्रायब्यूनलपुढील वांध्यांचा निवाडा लागण्यापूर्वीच कांहीं बँकांनीं कांहीं नोकरांना कमी करावयास, त्यांचे पगार उतरविण्यास व त्यांची बदली करण्यास प्रारंभ केला आहे. विशेषतः नोकरांच्या ट्रेड युनियन्सच्या कार्यकर्त्यांना ह्यासाठीं निवडून काढण्यांत येत आहे, अशी तक्रार आहे. ती मजूर खात्याच्या मंत्र्यांपुढें मांडावयास बँकांच्या नोकरांना वेळ मिळावा ह्यासाठीं ट्रायब्यूनलचें काम २२ फेब्रुवारीनंतर कांहीं दिवस तहकूब राहणार आहे.

### प्रवासी वहातूक संस्थांना मान्यता देण्याची व्यवस्था

प्रवासी वहातूक संस्थांना मान्यता देण्याबाबत वहातूक खात्याच्या प्रवासी वाहतूक सल्लागार समितीच्या विचारानें तयार केलेल्या नव्या पद्धतीप्रमाणें पुढील संस्थांना मान्यता देण्याचें ठरलें आहे:—( १ ) गोवन एजन्सीज लि. नवी दिल्ली, ( २ ) अय्यर अॅण्ड सन्स. लि. नवी दिल्ली व ( ३ ) तुळशीदास खिमजी, मुंबई. युद्धापूर्वी ज्यांना मान्यता मिळालेली होती अशा पुढील संस्थांची मान्यता तशीच चालू राहील:—( १ ) अमेरिकन एक्स्प्रेस कं., मुंबई, ( २ ) थॉमस कुक अॅण्ड सन, मुंबई. ( ३ ) चंन्सिमल बसरमल अॅण्ड कं., मुंबई. ( ४ ) जीना अॅण्ड कंपनी, मुंबई. ( ५ ) राम मोहन अॅण्ड कंपनी, मद्रास. ( ६ ) ग्रिंडले बँक लि. ( ७ ) ली अॅण्ड मूरहेड, मुंबई, ( ८ ) कॉक्स अॅण्ड किंग ( एजंटस ) लि. मुंबई. ( ९ ) बामर लॉरी अॅण्ड कं. कलकत्ता.

यापुढें प्रवासी वहातूक संस्थांना इतर गोष्टींबरोबरच, वहातूक खात्याच्या प्रवासी वहातूक संघटनेच्या मध्य व प्रादेशिक कचेऱ्यांशीं संबंध ठेवावा लागेल आणि केवळ तिकिटें देण्याखेरीज वहातुकीच्या व राहण्याच्या सोयी, चलन, जकात निर्बंध, पोस्टाचे दर वगैरेबाबत प्रवाशांना प्रत्यक्ष मदत करूं शकेल असा आपल्या नोकरवर्गापैकीं एक प्रमुख इसम नेमावा लागेल. मान्यता मागण्यासाठींच्या नव्या अर्जांचा विचार वर्षांतून एकदांच म्हणजे नोव्हेंबर महिन्यांत होईल व दिलेली मान्यता ही त्यापुढील वर्षाच्या सुरुवातीपासून लागू होईल.


बेडेकर मसाले




## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—६७, अपोलो स्ट्रीट, सोनावाला बिल्डिंग, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे. आमचा कारभार वरील तत्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

## पुणें जिल्हा खरेदी-विक्री संघ लि., पुणें

### शेतकी विभागाचा उद्घाटन समारंभ

शेतकऱ्यांच्या मालाची विक्री आणि त्यांना व ग्राहक सहकारी संस्थांना लागणाऱ्या जिनसांचा पुरवठा करण्याकरितां संघातर्फे सुरू करावयाच्या शेतकी विभागाचा ( अढत दुकान ) उद्घाटन समारंभ विकास मंत्री ना. नाईक निंबाळकर ह्यांच्या हस्तें संस्थेच्या जागेंत, भवानी पेठेंत, ता. १२ फेब्रुवारी रोजीं झाला.

### मि. लॅमिंग ह्यांची प्रां. स. इन्स्टिटयूटला भेट

इंटर नॅशनल लेबर ऑफिस, जिनीव्हाच्या कोऑपरेशन व हँडिक्रॅफ्ट विभागाचे प्रमुख मि. जी. एन. लॅमिंग, ह्यांनीं ७ फेब्रुवारी रोजीं मुं. प्रां. सहकारी इन्स्टिटयूटला भेट दिली. मुंबई प्रांतांतील व भारतांतील सहकारी चळवळीच्या प्रगतीबाबत त्यांनीं इन्स्टिटयूटच्या एक्झिक्युटिव्ह कमिटीच्या सभासदांशीं चर्चा केली.

### बँकस ट्रायब्यूनलचें काम तहकूब


ऑल इंडिया इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल ( बँक डिस्प्यूट्स ) हें जून १९४९ मध्यें नेमण्यांत आलें आणि त्याचें काम चालू आहे. परंतु ट्रायब्यूनलपुढील वादांचा निवाडा लागण्यापूर्वीच कांहीं बँकांनीं कांहीं नोकरांना कमी करावयास, त्यांचे पगार उतरविण्यास व त्यांची बदली करण्यास प्रारंभ केला आहे. विशेषतः नोकरांच्या ट्रेड युनियन्सच्या कार्यकर्त्यांना ह्यासाठी निवडून काढण्यांत येत आहे, अशी तक्रार आहे. ती मजूर खात्याच्या मंत्र्यांपुढें मांडावयास बँकांच्या नोकरांना वेळ मिळावा ह्यासाठी ट्रायब्यूनलचें काम २२ फेब्रुवारीनंतर कांहीं दिवस तहकूब राहणार आहे.

### प्रवासी वहातूक संस्थांना मान्यता देण्याची व्यवस्था

प्रवासी वहातूक संस्थांना मान्यता देण्याबाबत वहातूक खात्याच्या प्रवासी वाहतूक सल्लागार समितीच्या विचारानें तयार केलेल्या नव्या पद्धतीप्रमाणें पुढील संस्थांना मान्यता देण्याचें ठरलें आहेः—( १ ) गोवन एजन्सीज लि. नवी दिल्ली, ( २ ) अय्यर ॲण्ड सन्स. लि. नवी दिल्ली व ( ३ ) तुळशीदास खिमजी, मुंबई. युद्धापूर्वी ज्यांना मान्यता मिळालेली होती अशा पुढील संस्थांची मान्यता तशीच चालू राहीलः—( १ ) अमेरिकन एक्स्प्रेस कं., मुंबई, ( २ ) थॉमस कुक ॲण्ड सन, मुंबई. ( ३ ) बन्सिमल बसरमल ॲण्ड कं., मुंबई. ( ४ ) जीना ॲण्ड कंपनी, मुंबई. ( ५ ) राम मोहन ॲण्ड कंपनी, मद्रास. ( ६ ) ग्रिंडले बँक लि. ( ७ ) ली ॲण्ड मूरहेड, मुंबई, ( ८ ) कॉक्स ॲण्ड किंग ( एजंटस ) लि. मुंबई. ( ९ ) बामर लॉरी ॲण्ड कं. कलकत्ता.

यापुढें प्रवासी वहातूक संस्थांना इतर गोष्टींबरोबरच, वहातूक खात्याच्या प्रवासी वहातूक संघटनेच्या मध्य व प्रादेशिक कचेऱ्यांशीं संबंध ठेवावा लागेल आणि केवळ तिकिटें देण्याखेरीज वहातुकीच्या व राहण्याच्या सोयी, चलन, जकात निर्बंध, पोस्टाचे दर वगैरेबाबत प्रवाशांना प्रत्यक्ष मदत करूं शकेल असा आपल्या नोकरवर्गापैकीं एक प्रमुख इसम नेमावा लागेल. मान्यता मागण्यासाठींच्या नव्या अर्जांचा विचार वर्षांतून एकदांच म्हणजे नोव्हेंबर महिन्यांत होईल व दिलेली मान्यता ही त्यापुढील वर्षाच्या सुरुवातीपासून लागू होईल.

मसाले





### 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—६७, अपोलो स्ट्रीट, सोनावाला बिल्डिंग, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे. आमचा कारभार वरील तत्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.